**योजना क्र. १**

**युवक-युवतींमध्ये संवाद कौशल्य व व्यक्तीमत्त्व विकास, उद्योजकता विकास तसेच विविध विषयांबाबत जाणिव व जागृती होणेकरीता विविध शिबिरे/कार्यक्रम आयोजित करणे.**

| | | |
|---|---|---|
| **योजना उद्देश** | :- | नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील युवक - युवतींमध्ये नेतृत्व गुणांना वाव मिळवून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, विविध व्यवसायाची माहिती व्हावी व त्यांच्या कला गुणांप्रमाणे व्यवसायाची निवड करणेसाठी मदत व्हावी तसेच त्यांचेमध्ये पर्यावरण संवर्धन, पाणी वापराचे महत्त्व, आरोग्य, विविध व्यसनांचे शारिरिक व सामाजिक दुष्परिणाम, स्वच्छतेचे महत्त्व, शिक्षणाचे महत्त्व, आहाराचे महत्त्व विषयक माहिती व जाणीव होणेकरीता युवक-युवतींकरीता संवाद कौशल्य व व्यक्तीमत्त्व विकास, उद्योजकता विकास व जाणिव जागृतीपर शिबिर/ कार्यक्रमाचे आयोजन करणे. |
| **कार्यक्षेत्र** | :- | नवी मुंबई महानगरपालिका |
| **प्रस्तावित लाभार्थी** | :- | २००० |
| **प्रति लाभार्थी खर्च** | :- | प्रति गट रु. १०,०००/- (१ गट - ५० युवक/युवती) |
| **योजनेच्या अटी व शर्ती** | :- | १. कुटूंबाचे महानगरपालिका क्षेत्रात किमान ३ वर्षे वास्तव्य असलेबाबत पुरावा म्हणून मालमत्ता धारक असल्यास चालू वर्षाचा मालमत्ता कर भरल्याची पावती/ निवडणूक ओळखपत्र/ मतदार यादीतील नांव/ पाणीपट्टी/ वीज बिल/ आधार कार्ड/ ३ वर्षाचा भाडे करारनामा/ पारपत्र (Pass Port)/ रेशनकार्ड / विवाह नोंदणी दाखला / राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक पुरावा म्हणून सादर करावा लागेल.<br>२. अर्जदाराने अर्जासोबत वयाचा पुरावा जोडणे आवश्यक राहील.<br>३. अर्जासोबत अलीकडील काळात काढलेला पासपोर्ट साईज आकाराचा फोटो लावणे आवश्यक राहील.<br>४. या योजने अंतर्गत शिबिरात सहभागी होणाऱ्या लाभार्थ्यास प्रशिक्षणासाठी लागणारे अभ्यास साहित्य, साधन सामुग्री, स्टेशनरी इत्यादीचा खर्च अंतर्भूत राहील.<br>५. अर्जासोबत जोडण्यात आलेली सर्व छायांकित कागदपत्रे सक्षम अधिका-याने प्रमाणित केलेली असावीत.<br>६. दाखल केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने प्रशिक्षणाकरीता शिफारस करणे अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त यांना राहील. |
| **विद्यार्थी व युवक कल्याण समिती अंतर्गत :- अंदाजपत्रकीय तरतूदीच्या अधिन राहून** | | |